# प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय

**अन्तर्राष्ट्रीय मुख्यालय** : पाण्डवभवन , आबू पर्वत - 307501 (राजस्थान)
**स्थानिक सेवाकेंद्र** : ओमशान्ति भवन, ढाके कालोनी ,**जलगांव**-425001
**फोन** : : 0257-2236259 **Email** : jalgaon@bkivv.org
**वेबसाईट:www.brahmakumaris.com हिंदी वेबपोर्टल- www.bkvarta.com**


भारत में 8500 से अधिक तथा 130 देशोमें 300 से अधिक राजयोग सेवाकेंद्र विश्व में प्रेम, शान्ति तथा सदाचार स्थापन करनमें समर्पित है ।

## केवळ स्थूल अपघात नव्हे तर, जीवनातील ब-याच अपघतांना मानवी मन जबाबदार,

### परिवहन सुरक्षा संमेलनातील वक्त्यांचा सूर

**जळगांव** ( ) रस्ता अपघात, रेल्वेअपघात वा इतर परिवहन व्यवस्थेतील अपघातास बहुतांश चुका मानवी असतात, त्यामुळे मनावरील नियंत्रणाने बहुतांश अपघात कमी होऊ शकतात, परंतु जीवन जगत असतांना छोट्या मोठ्या संकट रूपी अपघात हे देखील जीवनाचा नाश करणारे ठरतात त्यासाठी परीवहन व्यवस्थेतील सर्वच घटकांना आता आध्यात्मिकतेची गरज आहे असा सूर सुरक्षित परीवहन व्यवस्थेसाठी आध्यात्मिकता या विषयावर जिल्हास्तरीय संमेलनातील वक्त्यांनी व्यक्त केला.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे आज दि. ३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता सुरक्षित परीवहन व्यवस्थेसाठी आध्यात्मिकता या विषयावर जिल्हास्तरीय संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमास मुख्य संबोधन विद्यालयाचे मुख्यालय माऊंट आबू राजस्थान हुन आलेले ब्रह्माकुमार सुरेशभाई, मुख्यालय समन्वयक ट्रान्सपोर्ट अॅण्ड ट्रॅव्हल्स विंग यांनी केले. आपल्या संबोधनात त्यांनी परिवहन सुरक्षेसाठी करावयाच्या स्थूल उपाय योजनेबरोबर मनोवृत्त मजबूत करण्यासाठी, तसेच मनास ब्रेक लावण्यासाठी आध्यात्मिकता अत्यंत आवश्यक आहे. परिवहन राज्यमंत्री ना. गुलाबराव देवकर यांनी सरकारी पातळ्यांवर परिवहनाच्या उपाय योजनेबरोबर ब्रह्माकुमारीज् सारख्या सामाजिक शैक्षणिक संस्थांनी केलेले प्रयत्न स्तुत्य असल्याचे म्हटले. ब्रह्माकुमारी मिनाक्षीदीदी यांनी राजयोग ध्यान करविले,

याप्रसंगी डॉ. बच्छाव, डी.बी. महाजन, नरेंद्रसिह राजपूत, श्रीकांत चौधरी, चंद्रशेखर पाटील, शांतारामभाई, मधुकर भाई, सोनीभाई यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले तसेच त्यांची समायोचित भाषणे झाली. सूत्रसंचलन ब्र.कु. हेमलता यांनी तर आभार बी.के. शिरीन यांनी केले.

या संमेलनास वाहतुक-प्रवासी संघटना, ट्रक, ऑटो, मॅटोडोर, रिक्षा चालक-मालक, दुचाकी, चारचाकी चालक, नियंत्रक, (ड्रायव्हर-कंडक्टर) रेल्वे, रस्ता परिवहन, दळणवळन/यातायात, पर्यटन, ऑटोमोबाईल्स, सरकारी-निमसरकारी-सहकारी-खाजगी वहातुक/परीवहन सेवेतील व्यक्ति, पोलिस, अधिकारी, कर्मचारी, वाहन विक्रेता, सर्व फोर व्हिलर, थ्री व्हिलर, टु व्हिलर चालक,मालक, ड्रायव्हर, ड्रायव्हींग स्कूल आदि बंधु भगीनी सहभागी होते.

००००

कृपया उपरोक्त कार्यक्रमाचे वृत्त आपल्या दैनिकातून प्रसिद्ध करून सहकार्य करावे ही विनंती.

डॉ. सोमनाथ वडनेरे
समन्वयक, ब्रह्माकुमारीज् मीडिया प्रभाग

फोटो कॅप्शन - १)
जळगाव : प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे आयोजित सुरक्षित परीवहन व्यवस्थेसाठी आध्यात्मिकता या विषयावर मुख्य संबोधन करतांना विद्यालयाचे मुख्यालय माऊंट आबू राजस्थानहुन आलेले ब्रह्माकुमार सुरेशभाई, मुख्यालय समन्वयक ट्रान्सपोर्ट अॅण्ड ट्रॅव्हल्स विंग, व्यासपिठावर डावीकडून ब्र.कु. हेमलता बहन, ना. गुलाबराव देवकर
ब्र.कु. मिनाक्षीदीदी, डॉ. बच्छाव, डी.बी. महाजन, नरेंद्रसिह राजपूत, श्रीकांत चौधरी, चंद्रशेखर पाटील आदि दिसत आहेत.

फोटो कॅप्शन - २)
जळगाव : प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे आयोजित सुरक्षित परीवहन व्यवस्थेसाठी आध्यात्मिकता या विषयावरील संमेलनाचे उद्घाटन करतांना डावीकडून माऊंट आबू राजस्थानहुन आलेले ब्रह्माकुमार सुरेशभाई, मुख्यालय समन्वयक ना. गुलाबराव देवकर, परीवहन राज्यमंत्री, ब्र.कु. मिनाक्षीदीदी, डॉ. बच्छाव, डी.बी. महाजन, नरेंद्रसिह राजपूत आदि दिसत आहे.

फोटो कॅप्शन - ३)
जळगाव : प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे आयोजित सुरक्षित परीवहन व्यवस्थेसाठी आध्यात्मिकता या विषयावर आयोजित संमेलनात संबोधन करतांना, परीवहन राज्यमंत्री व पालकमंत्री ना. गुलाबराव देवकर, माऊंट आबू राजस्थानहुन आलेले ब्रह्माकुमार सुरेशभाई, मुख्यालय समन्वयक ट्रान्सपोर्ट अॅण्ड ट्रॅव्हल्स विंग, व्यासपिठावर डावीकडून ब्र.कु. हेमलता बहन, ब्र.कु. मिनाक्षीदीदी, डॉ. बच्छाव, डी.बी. महाजन, नरेंद्रसिह राजपूत, श्रीकांत चौधरी, चंद्रशेखर पाटील आदि दिसत आहेत.